# प्रकरण चार

# लघुपाटबंधारे विभाग

**4.283 पंचायत समिती सेस अनुदानातून कळवण खुर्द सर्फेस टँक करणे कामातील अनियमितता.**

**पंचायत समिती कळवण, जिल्हा नाशिक सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 47 व 48) -** पंचायत समिती सेस अनुदानातून कळवण खुर्द येथे सर्फेस टँक करणे यासाठी परिच्छेद क्रमांक 47 अन्वये रुपये 3,84,482/- व परिच्छेद क्रमांक 48 अन्वये रुपये 2,12,907/- एकूण रक्कम रुपये 5,97,389/- खर्च करणेत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

वरील नमूद कामावरील खर्चाच्या अनुषंगाने कामाची नस्ती, अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका यांचे तपासणी अंती खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पंचायत समिती सेस अनुदानातून कळवण खुर्द येथे सर्फेस टँकचे काम करुन मिळावे याबाबत कोणतेही मागणीपत्रे नस्तीसोबत आढळून आलेली नाही. त्यामुळे सदर सर्फेस टँकचा फायदा कोणास होणार याबाबत समजू शकत नाही.

2) दोन्ही कामांकरिता सर्फेस टँक खोदकामातून कठीण मुरुम 1,216.75 घ.मी. म्हणजेच 430 ब्रास आणि मऊ दगड 2,648.80 घ.मी. म्हणजेच 936 ब्रासइतके मटेरीयल उपलब्ध झालेले आहे. सदर साहित्याचा वापर कोठे केला याबाबत मोजमाप पुस्तिकेत काहीही उल्लेख केलेला नाही. सदर साहीत्याची किंमत मोठया प्रमाणावर असल्याने त्याचा उपयोग इतर कामांसाठी करुन पंचायत समिती सेसनिधीची बचत करणे शक्य झाले असते. तथापि याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**4.284 मौजे बिरवाडी येथे पाटचारी करणे, तालुका महाबळेश्वर.**

**पंचायत समिती महाबळेश्वर, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 31) -** पंचायत समिती महाबळेश्वर यांनी पंचायत समिती उपकर निधीतून 5 लघुपाटबंधारे लेखाशिर्षांतर्गत मौजे बिरवाडी येथे पाटचारी करणेसाठी रुपये 1,20,597/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर काम पंचायत समिती उपकरातील असल्याने निविदा प्रक्रिया पंचायत समिती यांनी राबविणे आवश्यक असतांना निविदा प्रक्रिया अध्यक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती बिरवाडी यांनी राबविली आहे.

2) सरपंच, ग्रामपंचायत बिरवाडी यांनी अध्यक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडे अंदाजपत्रकीय दराची निविदा सादर केली असून ती मान्य करण्यात आली आहे. सदर प्रक्रिया पंचायत समिती स्तरावरील नसल्याने नियमबाहय आहे.

3) बाब क्रमांक 2 कठीण मुरुमात खुदाईचे काम 10 टक्के पेक्षा जादा झाल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 152 (अ) नुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असतांनाही तशी कार्यवाही केली नाही.

4) बाब क्रमांक 3 नुसार कॅनॉलच्या भिंतीचे काम करण्यापूर्वी भिंतीखाली पीसीसी चे काम केल्याची मोजमापे नोंदलेली नाहीत. त्यामुळे काम तांत्रिकदृष्टया योग्य असल्याचे दाखविणे आवश्यक आहे.

5) बाब क्रमांक 5 नुसार दिनांक 25/03/2015 रोजी पाण्याचा उपसा केल्याची नोंद आहे. तथापि मार्च महिन्यात 1.40 मीटर खोलीवर मार्चमध्ये पाणी लागणे शक्य नाही. त्यामुळे खर्च रुपये 592/- मान्य करता येत नाही.

6) ग्रामविकास व जसलधारण विभाग शासन निर्णय क्रमांक 20/05/1999 नुसार कामाच्या ठिकाणी माहितीदर्शक फलक लावणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

7) सदर काम ज्या जागेवर केले त्या जागेचा मालकी हक्काची कागदपत्रे पहावयास मिळाली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 165 नुसार मोजमापे नमुना नंबर 52 मध्ये ठेवणे आवश्यक असतांना ग्रामपंचायत नमुना नंबर 23 मध्ये घेतलेली आहे.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 87 नुसार वापरलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल घेतले नाहीत.

10) महसुल व वनविभाग अधिसुचना दिनांक 11/02/2010 नुसार 2,483/- रॉयल्टी वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

**4.285 टँकर खर्चाबाबत.**

**पंचायत समिती कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती कवठेमहांकाळचे सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणमध्ये टँकरवर रक्कम रुपये 6,37,700/- इतका खर्च करण्यात आला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त आदेशातील अट क्रमांक 3 नुसार जीपीएस प्रणाली सिस्टीम टँकरवर बसविणे बंधनकारक आहे परंतु त्याचा अहवाल नस्तीसोबत नसल्याने जीपीएस प्रणाली सिस्टीम टॅकरवर बसविली नसल्याचे दिसून येते त्यामुळे केलेल्या फेऱ्यांची अचूकता पडताळता न आल्याने अदा केलेली रक्कम योग्यरीत्या अदा झाल्याची खात्री करता आली नाही.

2) केलेल्या प्रवासाच्या नोंदी लॉग बुक मध्ये घेणे आवश्यक आहे तथापी मीटर रीडिंग नोंद नसल्याने त्याबाबत खात्री करता आली नाही.

3) टँकर यांत्रिक दृष्ट्या चांगल्या स्थितीत असून पाणीपुरवठा पाणी वाहतूक कामासाठी वापरण्यास योग्य असल्याबाबतचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सांगली यांचे प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकेट) वाहनधारकाने हजर करण्याचे आहे परंतु सदर प्रमाणपत्र नस्तीसोबत नसल्याने वाहन योग्य स्थितीत असल्याबाबची खात्री करता आली नाही.

4) वाहन धारकाचे ड्रायवर परवाना, वाहन परवाना, करार नामा पत्र इत्यादी कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

5) पाणी उद्भावाची OT टेस्ट घेतल्याचा अहवाल नस्ती सोबत जोडलेला नाही.

6) टँकरने केलेल्या फेऱ्यांच्या नोंदी सामोर लॉग बुक मध्ये 5 व्यक्तींच्या स्वाक्षरी आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

7) लॉग बुके विहित नमुन्यात ठेवलेली नाहीत.

8) टँकरचे पाणी भरण्या पूर्वीचे वजन व पाणी भरल्या नंतरच केलेल्या वजनाच्या पावत्या नस्तीसोबत जोडल्या नसल्यामुळे प्रत्यक्षात किती टन पाणी पुरवठा केला याबाबत खात्री करता आली नाही.

**4.286 ब्लिचींग खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती यवतमाळ, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 27) -** पंचायत समिती सेसमधुन 100 टक्के सुटीवर ग्रामपंचायतीना पुरविण्यात आलेल्या ब्लिचींग खरेदीवर रक्कम रुपये 3,39,480/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ज्या ग्रामपंचायतीचे उत्पन्न कमी आहे, ज्या ग्रामपंचायती आर्थिक दृष्टया कमकुवत आहे, याबाबत यादी तयार करुन त्याच ग्रामपंचायतीना ब्लचींगचा पुरवठा करणे आवश्यक असतांना सरसकट सर्व ग्रामपंचातींनी पुरवठा करण्यात आलेला आहे.

2) एकाच पुरवठादाराकडुन खरेदी केलेल्या ब्लिचींगच्या दरात तफावत आढळुन आलेली आहे.

3) एकाच दिवशी पुरवठा आदेश व एकाच दिवशी पुरवठा प्राप्त व देयकाचे प्रदान ही बाब संयुक्तीक नाही.

4) पुरवठादाराच्या बिजकाची तपासणी केली असता बीलावर बॅच क्रमांक, उत्पादन दिनांक, मुदतबाहय दिनांक ईत्यादी तपशील नमुद नसतांना सदर साहीत्य स्विकारण्यात आलेले आहे.

5) साठा नोंदवहीची तपासणी केली असता वाटप व शिल्लकेवर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याचे निदर्शनास आले आहे.

**4.287 धडक सिंचन विहीर योजनेबाबत. (जिल्हा निधी)**

**पंचायत समिती दारव्हा, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15)** - धडक सिंचन विहीर योजनेअंतर्गत रक्कम रुपये 5,61,082/- खर्च झाला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती धडक सिंचन विहीर योजना 2014-2015 साठी चे लक्ष निश्चित करुन दिले त्या प्रमाणात पुर्ण झालेल्या विहीरीचे प्रमाण केवळ 50 टक्के पेक्षा कमी आढळले. यासाठी संबधीत कार्यकारी यंत्रणेला विचारले असता त्यांनी शेतक-यांची आर्थिक परिस्थिती व काही प्रमाणात इच्छाशक्तीचा अभाव असल्याचे नमुद केले आहे. या उणिवा भरुण काढण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येत आहे ते नमुद करावे.

2) पुर्ण झालेल्या धडक सिंचन विहीरीची उपयोगिता व फलश्रृती दिसुन येण्यासाठी शेतकरी यांच्या शेतीच्या उत्पादकते मध्ये किती प्रमाणात वाढ झाली व त्यांचा राहणीमानात काही बदल झाला किंवा जिल्हयातील शेतकरी आत्महत्या करण्याच्या विचारापासुन दुर होतील व शेतकरी त्यांच्या जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक विचार करतील.

**4.288 धडक सिंचन विहीरीच्या कामाकरीता अग्रीम स्वरुपात दिलेल्या रक्कमेबाबत.**

**पंचायत समिती राळेगाव, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सन 2014-2015 अखेर पर्यंत धडक सिंचन विहीरीच्या कामाकरीता 40 लाभार्थ्यांना रक्कम रुपये 10,000/- प्रमाणे रक्कम रुपये 4,00,000/- प्रदान करण्यात आले. परंतू सदरहू लाभार्थ्यानी काम सुरु केलेले नाही, त्यामुळे शासनाचे रक्कम रुपये 4,00,000/- गुंतून पडले. तरी याबाबत संबंधीताकडून रक्कम वसुल करण्यात यावी.

**4.289 रोजगार हमी योजना अंतर्गत जवाहर विहीर कार्यक्रम सन 2007-2008 अतिरिक्त लक्षांक/मुळ लक्षांक खर्चाबाबत.**

**पंचायत समिती सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2014-2015 मध्ये अतिरिक्त 2 पुर्ण झालेल्या विहीरीच्या मंजुरीचे कागदपत्र व मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली व मुळ लक्षाकांच्या 3 पूर्ण झालेल्या विहीरीच्या मंजुरीचे कागदपत्र व मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली आहे. पर्यायाने 5 लाभार्थ्यांचे विहीरीचे करारनामे, लाभार्थी निवड, मोजमाप पुस्तिका तपासली याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरीलप्रमाणे 5 विहीरीचे करारनामे तपासले असता, करारनामा नुसार विहीर पुर्णभरण, फळझाडे, लागवड, इतवेल ड्रिलींगचे काम केल्याबाबत मोजमाप पुस्तिकेमध्ये नमुद नाही व पुर्ण अनुदान मंजुर करुन शोधन केले आहे. परंतु महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक जविका 1298/प्र.क्र.104/रोहयो-10, मंत्रालय मुंबई 400032,दिनांक 01/07/1999 मधील प्रस्तावनेनुसार पाणी भरविणे व जिरविणे हा या योजनेमागचा उद्देश आहे. परंतु सदर उद्देश सफल झालेला नाही.

2) प्रशासकीय मंजुरी आदेशानुसार निवड झालेल्या लाभार्थ्यांची त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राची तपासणी करुन अहवाल प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याचे दिनांकापासून एक महिन्याचे आत उपविभागीय अधिकारी, (सिंचाई) यांचेकडे तपासणी अहवाल सादर करावयाचा आहे परंतु सदर अहवाल सादर केलेला नाही.

3) प्रशासकीय मंजुरी बाब क्रमांक 3 नुसार प्रशासकीय मंजुरी पासुन तथा करारनाम्यापासुन 6 महिण्याचे आंत जवाहर विहीरीचे बांधकाम करणे अनिवार्य आहे, जर त्याने 6 महिन्याचे आत विहीर बांधकामास सुरुवात न केल्यास त्याची विहीर आपोआप व्यपगत होईल, असे असतांना 32 विहीरी अपुर्ण आहेत सदर विहीरी व्यपगत करावयास पाहिजे, परंतु केलेल्या नाहीत.

4) ज्या लाभार्थ्यांच्या विहीरी पुर्ण झालेल्या आहेत त्या लाभार्थ्यांच्या 7/12 च्या उताऱ्यांमध्ये विहीरीची नोंद करण्यात आल्याबाबतचे 7/12 चे उतारे उपलब्ध झालेले नाही. पुर्ततेसह अनुपालन दर्शवावे.

**4.290 लघुसिंचन उपविभागा अंतर्गत अपुर्ण कामाचा निधी शासन खाती न भरणा करणेबाबत.**

**पंचायत समिती परभणी, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती, परभणी अंतर्गत सन 2014-15 चे लेखापरीक्षणात लघुसिंचन उपविभागाची माहे मार्च 2015 चे मासीक प्रगती अहवालाची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सिमेंट बंधारे च्या सन 2013-14 मधील कामात, मौजे बोरवंड बुद्रूक, तालुका परभणी येथील सिमेंट बंधाऱ्याचे कामा करीता रुपये 15,79,000/- अनुदान मंजूर आहे. परंतु खोदकाम सुरु होऊन काम बंद आहे. मौजे जवळा, तालुका पालम येथील सिमेंट बंधाऱ्याचे काम रुपये 8,74,000/- चे खोदकाम पूर्ण करुन काम बंद आहे. मौजे पोखर्णी-2, तालुका गंगाखेड येथील पाझर तलावाचे रुपये 22,96,000/- चे काम शेतकऱ्यांनी काम अडविल्यामुळे काम सुरु होऊ शकले नाही. या बाबतीत महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-1002/प्र.क्र.128/आर्थोपाय, दिनांक 06/06/2008 प्रमाणे शिल्लक अनुदान शासनाकडे भरणा केले नाही. त्यामुळे रुपये 47,49,000/- इतका शासन निधी नाहक गुंतून पडला आहे.